# UNIVERSITY GRANTS COMMISSION
## NET BUREAU

**Code No : 38**

## Subject : MARATHI

**अभ्यासक्रम आणि नमुना प्रश्नपत्रिका**

**टीका :**

प्रश्नपत्रिका क्रमांक दोन (II) मध्ये वस्तुनिष्ठ स्वरूपाचे प्रत्येकी दोन (2) गुणांचे पन्नास (50) प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराचे चार विकल्प दिलेले असतील. त्या चारांपैकी एकच उत्तर बरोबर असेल. प्रश्नपत्रिका क्रमांक तीन (III) दोनशे गुणांची (200) असेल. यामध्ये दोन विभाग (A आनि B) असतील. विभाग A मध्ये एकंदर 10 (दहा) प्रश्न असून, त्यांपैकी प्रत्येक प्रश्न सोळा गुणांचा (16) असेल. प्रत्येक प्रश्नास त्याच विषयातील दुसऱ्या एका प्रश्नाचा विकल्प असेल. हे दहा प्रश्न अनिवार्य आहेत. विभाग B मध्ये 40 (चाळीस) गुणांचा एकच प्रश्न लिहावयाचा आहे. या प्रश्नास विकल्प असतील. विभाग A मधील प्रत्येक प्रश्नाचे उत्तर 300 शब्दांत लिहावयाचे असून विभाग B मधील प्रश्नाचे उत्तर 800 शब्दांत लिहावयाचे आहे.

**पत्रिका—II**

**1. भाषाविज्ञान व मराठी भाषेचा इतिहास**

भाषेचे स्वरूप

भाषेची उत्पत्ती

ध्वनिविचार

स्वन, स्वनिम, स्वनांतर, पद, पदिम, पदांतर, वाक्यविचार

अर्थविचार

मराठीची उत्पती

मराठीच्या प्रमुख बोली

प्रमाणभाषा व बोली

मराठी शब्दसंग्रह

अन्य भाषांचा मराठीवरील परिणाम

मराठीचे लेखनविषयक नियम

**2. मराठी वाङ्मयाचा इतिहास**

प्रारंभापासून इ.स. 2000 पर्यंत

**3. अन्य भाषांमधून मराठी भाषेत अनुवादित झालेले ग्रंथ**

**4. भारतीय साहित्यशास्त्र व साहित्य समीक्षा**

साहित्याचे स्वरूप व प्रयोजन

साहित्यनिर्मितिप्रक्रिया

भारतीय साहित्यशास्त्रातील प्रमुख प्रणाली व साहित्यशास्त्रकारांचे कार्य

साहित्यातील विविध संप्रदाय

शैली विचार

साहित्य समीक्षा : स्वरूप, व्याप्ती व प्रकार

साहित्य समीक्षेच्या पद्धती

प्रमुख पाश्चात्त्य समीक्षकांच्या सिद्धांतांचा परिचय

मराठी समीक्षेची वाटचाल

**5. व्याकरण :**

शब्दांच्या जाती

आख्यात, विभक्ती, संयुक्त क्रियापद

प्रयोग विचार

वाक्यविचार

शब्दसिद्धी

**6. पत्रलेखन पद्धती, जाहिराती, वृत्त व वृत्तांतलेखन**

## पत्रिका—III (A)

( अनिवार्य )

**इकाई—I**

(इ.स. 1200 ते 1818 या कालखंडातील प्रमुख ग्रंथकार व त्यांच्या साहित्यकृती यांचा अभ्यास)

प्रमुख महानुभाव ग्रंथकार

ज्ञानदेव, नामदेव व त्यांचे समकालीन संत

मुकुंदराज

एकनाथ, तुकाराम, रामदास, संत कवयित्री

मुक्तेश्वर, रघुनाथ पंडित, वामन पंडित, श्रीधर, मोरोपंत

बखर वाङ्मय

शाहिरी वाङ्मय

**इकाई—II**

इ.स. 1881 ते 2000 या कालखंडातील मराठी वाङ्मयाचा इतिहास. पुढील वाङ्मयप्रकारांच्या अनुषंगाने

कविता

नाटक

कादंबरी

कथा

ललित लेखन

**इकाई—III**

भाषाविज्ञान : ऐतिहासिक व वर्णनात्मक : स्वरूप व पध्दती

भाषाकुलाची संकल्पना व मराठी भाषा

मराठी भाषेची उत्पत्ती

स्वन, स्वनिम, स्वनांतर

पद, पदिम, पदान्तर

अर्थविचार

प्रमाण भाषा व बोली

मराठीच्या प्रमुख बोली

मराठीचा शब्दसंग्रह

अन्य भाषांचा मराठीवरील परिणाम

**इकाई—IV**

काव्यलक्षण व काव्यप्रयोजन

प्रतिभाविचार

शब्दशक्ती

रीतिविचार व ध्वनिविचार

रसविचार

काव्यानंदमीमांसा

**इकाई—V**

साहित्याचे स्वरूप व प्रयोजन

साहित्याची भाषा

साहित्यसमीक्षेचे स्वरूप व कार्य

आस्वादक समीक्षा

समाजशास्त्रीय समीक्षा

मार्क्सवादी समीक्षा

मनोवैज्ञानिक समीक्षा

आदिबंधात्मक समीक्षा

शैलीवैज्ञानिक समीक्षा

स्त्रीवादी समीक्षा

**इकाई—VI**

साहित्यप्रकाराची संकल्पना

कथा, कादंबरी, नाटक, कविता व चरित्र-आत्मचरित्र या साहित्यप्रकारांचे स्वरूप

**इकाई—VII**

मराठी साहित्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी

संस्कृतीचे स्वरूप, संस्कृती व साहित्य यांचा परस्परसंबंध

महानुभाव, वारकरी, दत्त, व समर्थ या संप्रदायांचे स्वरूप व कार्य

इंग्रजी राजवटीचा प्रारंभकाळातील महाराष्ट्रीय जीवनावरील परिणाम : धर्मविचार, शिक्षण संस्था, छापखाने, व इंग्रजी वाङ्मय यांचा महाराष्ट्रीय समाजावरील व मराठी वाङ्मयावरील परिणाम

धर्मविषयक उदारमतवादी चळवळी : परमहंससभा, प्रार्थनासमाज, व सत्यशोधक समाज यांचा मराठी वाङ्मयावर झालेला परिणाम

बहुजन समाजाच्या उन्नतीच्या चळवळी

स्त्रीविषयक सुधारणेचे विविध प्रयत्न

**किंवा**

साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास

साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास : हेतू, स्वरूप, आणि व्याप्ती

लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण आणि सामाजिक व वाङ्मयीन पर्यावरणाचा त्याच्यावर पडणारा प्रभाव

सामाजिक पर्यावरणाचा वाङ्मयीन अभिरुचीवर व वाङ्मयरूपांच्या निर्मितीवर होणारा परिणाम.

वाचकांची अभिरुची, प्रकाशन-व्यवहार, प्रसिध्दी-माध्यमे आणि वाङ्मयनिर्मिती यांचा परस्परांशी असणारा संबंध

**इकाई—VIII**

पुढील ग्रंथकारांच्या वैचारिक वाङ्मयाचा अभ्यास-

लोकहितवादी; म. जोतीराव फुले; ताराबाई शिंदे; गो. ग. आगरकर; विठ्ठल रामजी शिंदे; वि. दा. सावरकर; डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**इकाई—IX**

वाङ्मयीन चळवळीमागील कारणमीमांसा

महाराष्ट्रातील वाङ्मयीन चळवळंचे स्वरूप

भक्तिसाहित्याची चळवळ, भाषाशुद्धीची चळवळ, अनियतकालिकांची चळवळ, ग्रामीण साहित्याची चळवळ, दलित साहित्याची चळवळ

नियतकालिकांचा उदय आणि विकास

पुढील नियतकालिकांच्या कार्याचे समालोचन—

मनोरंजन, निबंधमाला, प्रतिभा, अभिरुचि, सत्यकथा, छंद, प्रतिष्ठान, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, युगवाणी, पंचधारा, अनुष्टुभ, अस्मितादर्श, कवितारती

**इकाई—X**

वज्राघात - ह. ना. आपटे, हरपले श्रेय - केशवसुत, औदुंबर - बालकवी, एकच प्याला - रा. ग. गडकरी, झेंडूची फुले- केशवकुमार, रणांगण - विश्राम बेडेकर, पृथ्वीचे प्रेमगीत - कुसुमाग्रज, स्मृतिचित्रे - लक्ष्मीबाई टिळक, श्यामची आई- साने गुरुजी, दंडकारण्यातील प्रणयिनी - दिवाकर कृष्ण, 'किडलेली माणसे' ही कथा - गंगाधर गाडगीळ, बळी- विभावरी शिरूरकर, धग - उध्दव शेळके, कोसला - भालचंद्र नेमाडे, सूड - बाबुराव बागूल, नटसम्राट - वि.वा. शिरवाडकर, ताम्रपट - रंगनाथ पठारे, आठवणींचे पक्षी - प्र.ई. सोनकांबळे, सलाम (कविता) - मंगेश पाडगावकर, योगभ्रष्ट (दीर्घ कविता) - वसंत आबाजी डहाके

## पत्रिका—III (B)

( ऐच्छिक/वैकल्पिक )

**ऐच्छिक—I : लोकसाहित्य**

लोकसाहित्याचे स्वरूप व व्याप्ती

लोकसाहित्याचे संकलन व संशोधन

लोककथा व लोकगीते या साहित्यप्रकारांचे स्वरूप व वाङ्मयीन गुणवत्ता

मराठीतील लोकसाहित्याचा आणि लोकप्रयोज्य कलांचा स्थूल परिचय

**ऐच्छिक—II : तौलनिक साहित्याभ्यास**

तौलनिक साहित्याभ्यासाचे स्वरूप व व्याप्ती

प्रभाव (Influence) आणि प्रभव (Reception) या संकल्पना

राष्ट्रीय साहित्य, विश्वसाहित्य आणि भारतीय साहित्य या संकल्पना

भाषांतर : स्वरूप, प्रकार व कार्य

अन्यभाषीय साहित्याचा मराठी साहित्यावरील प्रभाव

**ऐच्छिक—III : स्त्रीवादी साहित्याभ्यास**

स्त्रीवादी साहित्याभ्यासाचे स्वरूप व व्याप्ती

स्त्रीवादी समीक्षेची उपयुक्तता

मराठीतील स्त्रीप्रश्नसंबद्ध लेखन

मराठीतील स्त्रियांची कविता, कथा, कादंबरी व आत्मकथने

**ऐच्छिक—IV : ग्रामीण साहित्य**

ग्रामीण साहित्यनिर्मितीमागील प्रेरणा व ग्रामीण साहित्याचे स्वरूप

ग्रामीण साहित्याची वाटचाल व तीमधील सामाजिकता

ग्रामीण कथा, कादंबरी व कविता यांची स्वरूपवैशिष्ट्ये

पुढील प्रमुख ग्रामीण लेखकांच्या लेखनाची वैशिष्ट्ये व स्वरूप :

र. वा. दिघे, श्री म. माटे, ग.ल. ठोकळ, व्यंकटेश माडगूळकर, उद्धव शेळके, शंकर पाटील, द.मा. मिरासदार, रा. रं. बोराडे, आनंद यादव, भास्कर चंदनशिव, प्रतिमा इंगोले

**ऐच्छिक—V : दलित साहित्य**

दलित साहित्याच्या निर्मितीमागील प्रेरणा व दलित साहित्याचे स्वरूप

दलित साहित्याची वाटचाल व तीमधील सामाजिकता

दलित कथा, कविता व आत्मकथन यांची स्वरूपवैशिष्ट्ये

पुढील प्रमुख दलित लेखकांच्या लेखनाची वैशिष्ट्ये व स्वरूप :

बाबुराव बागूल, शंकरराव खरात, प्र.ई. सोनकांबळे, दया पवार, नामदेव ढसाळ, लक्ष्मण माने, यशवंत मनोहर, दलित लेखिका.

# नमुना प्रश्नपत्रिका

## पत्रिका—II

1. श्रवण बेळगोळचा शिलालेख कोणत्या शालिवाहन शकातील आहे?

   (A) 905

   (B) 927

   (C) 1030

   (D) 1309

2. पासोडीवर लेखन करणारा मराठी कवी कोण?

   (A) बहिणाबाई

   (B) हेमाडपंत

   (C) मोरोपंत

   (D) दासोपंत

3. 'थियरी ऑफ लिटरेचर' या ग्रंथाचा अनुवाद कोणी केला आहे?

   (A) स.गं. मालशे

   (B) रा. शं. वाळिंबे

   (C) श्री के. क्षीरसागर

   (D) भालचन्द्र नेमाडे

## पत्रिका—III (A)

1. पंडिती कवितेचे स्वरूपविशेष स्पष्ट करा.

   **किंवा**

   'ज्ञानदेवें रचिला पाया' या काव्यपंक्तीचा वारकरी संप्रदायाच्या संदर्भात विचार करा.

2. मराठी भाषेवर अन्य भाषांच्या झालेल्या परिणामाचे स्वरूप स्पष्ट करा.

   **किंवा**

   प्रमाण भाषा आणि बोली यांच्यातील संबंध सांगा.

**11.** मराठी लोकप्रयोज्य कलांचा परिचय करून द्या.

**किंवा**

विश्वसाहित्याची संकल्पना स्पष्ट करा.

**किंवा**

इ.स. 1960 नंतरच्या स्त्रियांच्या कथालेखनाचा आढावा द्या.

**किंवा**

ग्रामीण कवितेच्या विकासातील ठळक टप्पे सोदाहरण सांगा.

**किंवा**

दलित साहित्यातील सामाजिकतेचे स्वरूप स्पष्ट करा.

★ ★ ★